पुण अधिक उणे

# खुंटावरचे शहाणे

■ पराग करंदीकर

प्रातिनिधिक



अस्सल मराठी खेळ म्हणून कोणते असा प्रश्न विचारला तर हमखास उत्तर मिळते ते म्हणजे कबड्डी, खो-खो आणि आट्यापाट्या. यातील आट्यापाट्या कधीच संपला आहे. अर्थात तरीही राज्य सरकारच्या शिवछत्रपती पुरस्कारांच्या यादीमध्ये या खेळाला पुरस्कार दिले जातात. कबड्डीने देशाच्या सीमा ओलांडून आशियाई स्तरावरचे बस्तान बसविले आहे. इतकेच नव्हे तर थेट क्रिकेटच्या धर्तीवर प्रीमियर लीग स्पर्धा आयोजित करून आपल्या खेळाडूंना व्यावसायिक फायदा मिळवून देण्यामध्येही कबड्डीने यश मिळविले आहे.

खरे तर खो-खो हादेखील मराठी मातीमध्ये रुजलेला खेळ. पूर्वी अगदी गावागावांमध्ये पोहचलेला. पुण्यामधील महापौर करंडक क्रीडा स्पर्धा आठवा किंवा मुंबईत होणाऱ्या भाई नेरूरकर चषक स्पर्धा असो; खो-खो सामने पाहण्यासाठी काही हजार लोक सहज जमायचे. या गोष्टीला फार तर पंधरा-वीस वर्षे उलटली असतील. पण हल्ली खो-खो खेळण्यासाठीच फारसे कोणी येत नाही, तर पाहायला कोण येणार? नवमहाराष्ट्र संघाच्या वतीने ही स्पर्धा आयोजित करण्यात येत असली, तरीही त्यामध्ये नवमहाराष्ट्र वगळता पुण्यातील एकही संघ सहभागी होणार नाही. याचे मुख्य कारण म्हणजे खो-खोमधील राजकारणामुळे पुण्यातील बहुतेक संघ बंद पडले आहेत, किंवा आहेत त्या संघांमध्ये निमंत्रित अखिल भारतीय खो-खो स्पर्धेत सहभागी होण्याइतका दर्जा राहिलेला नाही. खरं तर या स्पर्धेच्या निमित्ताने या सगळ्या गोष्टींचा सारासार विचार होणे आवश्यक आहे.

खो-खो या खेळामध्ये १९७० ते १९९५ हा सुवर्णकाळ होता. दर वर्षी या खेळाला अर्जुन पुरस्काराने गौरविण्यात येत होते. संपूर्ण देशात नसला तरीही देशाच्या पश्चिम, पूर्व आणि दक्षिणेमध्ये खो-खो चांगला रुजला होता. विविध ठिकाणी स्पर्धाही होत होत्या. या स्पर्धा होत आहेत त्या ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या पंचाहत्तराव्या वाढदिवसानिमित्त. शरद पवार यांच्याच छत्रछायेखाली महाराष्ट्रामध्ये कबड्डी, खो-खो आणि कुस्ती हे खेळ वाढले. त्यांनीच त्याला राजाश्रय मिळवून दिला. इतकेच नव्हे तर या खेळाकडे अधिकाधिक तरुणांनी वळावे, मराठमोळे खेळ टिकावेत यासाठी बँकांमध्ये खेळाडूंची भरती करण्यासाठी पुढाकार घेतला. तीन-चार राष्ट्रीय बँकांचे संघ तयार झाले. एकूणच तो काळ खो-खोसाठी मंतरलेला होता. याच मार्गाने खरे तर कबड्डीही पुढे गेली. बुवा साळवींसारख्या संपूर्ण आयुष्य वाहून घेतलेला कबड्डीमहर्षी त्या खेळाने देशाच्या सीमा ओलांडाव्यात, यासाठी धडपडत होता. खो-खोसाठी ही धडपड त्या पद्धतीने केली गेली नाही. आणि पाहता पाहता या दोन्ही खेळांमधील अंतर वेगाने वाढत गेले. सध्या एका खेळाची आशियाई

पुण्याच्या नवमहाराष्ट्र संघाच्या वतीने या आठवड्यामध्ये अखिल भारतीय खो-खो स्पर्धा आयोजित करण्यात येणार आहे. खरे तर पुणे आणि मुंबई ही एके काळी खो-खोची जान होती. येथे होणाऱ्या छोट्या छोट्या स्पर्धांनाही भरपूर गर्दी व्हायची. अनेक संघ विजेते बनण्यासाठी लढायचे. खो-खो खेळणाऱ्यांना थेट बँकेत नोकरी लागायची. पण हे वैभव आता मात्र ओसरले आहे. वर्षातून कधी तरी होणारी एखादी खुली स्पर्धा आणि दोन चार वर्षांनी होणारी निमंत्रित स्पर्धा अशा खुरटलेल्या वातावरणामध्ये खो खो संपतो की काय, अशी भीती वाटू लागली आहे.

स्पर्धेपर्यंत मजल आणि दुसऱ्या खेळामध्ये राष्ट्रीय स्पर्धा आयोजित होताना मारामार एवढे हे अंतर पडले आहे.

असे का झाले असावे, याचा विचार खरे तर या खेळाशी असलेल्या सगळ्यांनीच केला पाहिजे. इतकेच नव्हे तर या खेळाने बाकीचे खेळ लोकप्रियतेची शिखरे गाठत असताना आपला खेळ मागे का पडतो आहे, याचा विचार करण्याची वेळ खरं तर उलटून गेली आहे; पण तरीही तो केला पाहिजे. योग्य ते नियमबदल, मैदानावर धावफलक, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या सगळ्याला सामावून घेतले पाहिजे. त्याचबरोबर खेळाशी संबंधित असलेल्या सगळ्यांनीच आपली मानसिकता बदलण्याची आवश्यकता आहे. ज्याच्या हातात संघटना, तोच विजेता हा प्रकार खो-खोमध्ये बंद करण्यासाठी खरे तर मोहीम उघडण्याची गरज आहे. पंचांचा वापर करून सामने जिंकण्याचे प्रकार खो-खोमध्ये होतात, तितके कोणत्याच खेळात होत नाहीत. याचे मुख्य कारण म्हणजे या खेळामध्ये नियमांमध्ये पारदर्शकता नाही. पंचाला वाटले की फाउल, त्याला वाटले की खेळाडू बाद... या प्रकारामुळे अनेक चांगल्या खेळाडूंची उमेदच मारली जात आहे. क्रिकेटसारख्या खेळामध्येही काळानुरूप बदलाला आपलेसे करण्यासाठी 'टी-२०'चे सामने आले. खो खोमध्ये मुळातच वेग आहे, आक्रमकता आहे. प्रेक्षकाला खिळवून ठेवण्याची प्रचंड ताकद आहे. पण त्याचा योग्य वापर व्हायला हवा. प्रत्येक शहरांमध्ये, जिल्ह्यामध्ये संघटना व खेळ कसा वाढेल याचा विचार व्हायला हवा. या खेळात सध्याचे चित्र म्हणजे प्रतिस्पर्धी संघ बंद कसा पडेल, याला हातभार लावण्यात सगळे आघाडीवर असतात, असे आहे. तात्पुरत्या लाभासाठी हे सगळे चांगले वाटते; पण दीर्घ काळाचा विचार केला तर हा सगळा खेळ खो-खोच्या मुळावर उठतो आहे. खेळामध्ये राजकारण असू नये असे म्हणतात. इथे राजकारण फक्त संघटनेत नाही, तर संघामध्ये खेळतानाही असते. खो देतानाही तो खेळाडू आपला आहे की दुसऱ्या संघाचा, दुसऱ्या जिल्ह्याचा हा विचार करण्याचे प्रशिक्षण येथे सुरुवातीपासूनच दिले जाते. आता हे थांबले पाहिजे; अन्यथा काही वर्षांमध्ये खो-खो हा फक्त इतिहासापुरता राहील.

नवमहाराष्ट्र संघाने खो-खोच्या प्रवासामध्ये मोठी भूमिका बजावली आहे. गेली अनेक वर्षे विविध स्पर्धांचे आयोजन करण्यापासून ते शालेय स्तरावर खेळाडू घडविण्यापर्यंतचे सर्व उपक्रम त्यांनी राबविले आहेत. पण हे करतानाही त्यांना आपले मन मोठे करावे लागणार आहे. प्रतिस्पर्धी नसला तर आपण विजेते होऊच शकत नाही, हे आता तरी त्यांनी ओळखायला हवे. या स्पर्धेमध्ये तब्बल ३० लाख रुपयांची बक्षिसे देण्यात येणार आहेत. खो-खोच्या इतिहासामध्ये एवढ्या मोठ्या रकमेची पारितोषिके देण्याची बहुधा ही पहिलीच वेळ असावी. ती अखेरची असू नये. यापुढे हा आकडा मोठा करण्यासाठी धडपड व्हायला हवीच; पण ही बक्षिसे जिंकण्यासाठी तुल्यबळ संघ असले पाहिजेत, त्यांच्यातील लढत प्रेक्षणीय व्हायला हवी तरच या खेळाकडे प्रेक्षक पुन्हा येतील. प्रेक्षक आले की खे... आणि पाठोपाठ पुरस्कर्ते ये... खो-खोपटूंना आता कोणतीही नोकरी देत नाही. याचे मुख्य क... म्हणजे ज्यांनी खो खोपटू म... नोकरी मिळविली, त्यांची बँके... वागणूक ही इतर कर्मचाऱ्यांना ... करणारी, त्यांच्यावर अन्याय क... होती. आपण खो-खो खेळतो, म... बँकेवर उपकार करतो, या भाव... हे खेळाडू वागले. परिणामी पु... खेळाडूंची भरतीच बंद ... आपली वर्तणूक ही भावी पि... संधीचे दरवाजे बंद करते आहे, ... जाणीवच त्यांना कोणी करून ... नाही. ती आता तरी करून दे... गरज आहे.

खरे तर एखाद्या स... सुरुवातीलाच वस्तुस्थितीची ... करून देण्याची पद्धत ... स्पर्धा संपली, की त्याची ... करून दिली जाते. पण ये... वस्तुस्थिती जाणीवपूर्वक ... देण्याचा प्रयत्न आहे; कार... स्पर्धेच्या निमित्ताने देश... आलेल्या खेळाडू, संघटक, ... माजी खेळाडू व प्रेक्षकांमध्ये ... चर्चा व्हावी. त्यातून काह... चांगले निघावे. ही स्पर्धा ... होणार याबद्दल शंका नाही, ... नवमहाराष्ट्र संघाचे नियोजन ... असते. पण त्यांच्याकडून ... खेळ पुन्हा जिंवत करण्याच... वाढविण्याच्या आणि गतवैभ... मिळवून देण्याच्या अपेक्षा आहे... त्यांनी समजून घेतले पाहिजे. ... हा प्रपंच.

parag.karan...
@timesgrou...